जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024

पुढारी

# तंत्रज्ञान अधिविभागामधील १७० विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांत निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२३-२४ या वर्षात १७० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हमधून अनेक राष्ट्रीय



व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थी अधिविभागामधील विविध अभियांत्रिकी शाखांमधून पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत. तंत्रज्ञान अधिविभागात विविध शाखांचा अभ्यासक्रम औद्योगिक कौशल्य, संशोधन व गुणवत्ता विकास आधारित असल्यामुळे विद्यार्थी सक्षम अभियंता बनण्यास मदत होते. निवड झालेले विद्यार्थी कंपन्यांमध्ये उत्तम कामगिरी बजावत असल्याने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हच्या माध्यमातून अंतिम वर्षात शिकत असतानाच रोजगाराची संधी उपलब्ध देत आहेत.

04 JUN 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ महिला संघ रवाना

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पगवारा, जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल महिला स्पर्धेसाठी कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचा संघ नुकताच रवाना झाला.

शिवाजी विद्यापीठ महिला संघाने गेली दोन वर्षे अनुक्रमे कांस्य व रौप्यपदक प्राप्त करून राष्ट्रीय विद्यापीठ पातळीवर दबदबा निर्माण केला आहे. या वर्षी हा संघ यशस्वी घोडदौड अखंड राखत सुवर्ण पदकाची कमाई करेल, असा विश्वास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त करत संघाला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्र-कुलगुरू प्रा डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. बाबासो उलपे, डॉ. राजेंद्र रायकर उपस्थित होते.



कोल्हापूर : ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल महिला स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. बाबासो उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. बाबासाहेब सरगर, प्रा. सुशांत कायपुरे.

शिवाजी विद्यापीठाच्या संघात शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त कर्णधार स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिश्मा कुडचे, प्रियंका अंची (सर्व शिवाजी विद्यापीठ), श्रावणी चौगुले, सानिका संकपाळ, अलिशा कांबळे, स्वाती कांबळे (सर्व महावीर कॉलेज), मनीषा पवार, आर्या पाटील (ए. सी. एस. कॉलेज, पलूस), निकिता पाटील, दीक्षा शिंदे (डॉ. पी. कदम महाविद्यालय, रामानंदनगर), हर्षदा कांबळे (कन्या महाविद्यालय, मिरज), सलोनी नलवडे (एस. जी. एम. कॉलेज, कराड), करिश्मा तारळेकर (विलिंग्डन कॉलेज, सांगली) यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. बाबासाहेब सरगर व मार्गदर्शक म्हणून प्रा. सुशांत कायपुरे हे काम पाहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024
पुढारी

# पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठात चर्चासत्र

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र अधिविभागात ५ जून पर्यावरण दिनानिमित्त सकाळी १०.३० वाजता 'कोल्हापूर @ ४१ अंश सेल्सिअस' या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कोल्हापुरातील पर्यावरणातील जाणकार चर्चासत्रात सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. यावर्षी उन्हाळ्यात देशभरात तापमानाने उच्चांक केला. कोल्हापूर त्याला अपवाद नाही. उन्हाळ्यातील तापमान यावर्षी महिनाभर ३९ अंशांवर होते. कोल्हापूर व एकूणच वाढलेले तापमान हा एक गंभीर प्रश्न बनला आहे. याला अनेक कारणे आहेत. जागतिक तापमान वाढ, अल निनो परिणाम व स्थानिक कारणेदेखील परिस्थितीला कारणीभूत आहेत. यापार्श्वभूमीवर हे चर्चासत्र आयोजित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024
पुढारी

# ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या आजअखेर ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ ॲग्रीकल्चर या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये झाल्या. परीक्षेला ५२ विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थी अनुपस्थित होते. दि. ३ रोजी पीजी डिप्लोमा इन जिओ-इन्फॉर्मेटिक्स, एम.एस्सी. (मॅथ्स), बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, एम.एस्सी. (इंडस्ट्रियल मॅथ्यस वुईथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. त्याचबरोबर विविध अभ्यासक्रमांचे निकालही जाहीर केले जात आहेत. सोमवारी ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. तर सोमवारअखेर एकूण ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. सोमवारी ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये पार पडल्या. तर कोल्हापूर जिल्ह्यातून तीन गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली असून, सांगली व सातारा या जिल्ह्यातून गैरप्रकाराची नोंद झालेली नाही.

जनसंपर्क कक्ष
04 JUN 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा महिला सॉफ्टबॉल संघ पंजाबला रवाना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवारा, जालंधर (पंजाब) येथे दि. ४ ते ८ जून दरम्यान ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल महिला स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला सॉफ्टबॉल संघ सहभागी होत आहे. गत दोन वर्षे महिला सॉफ्टबॉल संघाने अनुक्रमे कांस्य व रौप्यपदक प्राप्त करून राष्ट्रीय, विद्यापीठ पातळीवर दबदबा निर्माण केला आहे. यंदाही विद्यापीठाचा संघ स्पर्धेसाठी रवाना झाला.

यावर्षीही संघ पुन्हा यश प्राप्त करत सुवर्णपदकाची कमाई करेल, अशी आशा व्यक्त करत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी संघास शुभेच्छा दिल्या. संघामध्ये शिवछत्रपती पुरस्कार विजेती खेळाडू संघाची कर्णधार स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिश्मा कुडचे, प्रियंका अंची (सर्व शिवाजी विद्यापीठ), श्रावणी चौगुले, सानिका संकपाळ, अलिशा कांबळे, स्वाती कांबळे (सर्व महावीर कॉलेज, कोल्हापूर), मनीषा पवार, आर्या पाटील (ए. सी. एस. कॉलेज, पलूस), निकिता पाटील, दीक्षा शिंदे (डॉ. पी. कदम महा. रामानंदनगर), हर्षदा कांबळे (कन्या महा. मिरज), सलोनी नलवडे (एस. जी. एम. कॉलेज, कराड), करिश्मा तारळेकर (विलिंग्डन कॉलेज, सांगली) यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. बाबासाहेब सरगर व मार्गदर्शक म्हणून प्रा. सुशांत कायपुरे हे काम पाहत आहेत.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. बाबासो उलपे, डॉ. राजेंद्र रायकर यांनी संघाला शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ
04 JUN 2024

# विद्यापीठ सॉफ्टबॉल संघ जालंधरला रवाना

## आंतरविद्यापीठ स्पर्धेचे आयोजन; पंधरा जणींचा समावेश



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेसाठी रवाना होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाला डॉ. शरद बनसोडे, राजेंद्र रायकर, आदींनी शुभेच्छा दिल्या.

कोल्हापूर, ता. ३ : पगवारा-जालंधर (पंजाब) मधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये उद्या मंगळवार (ता. ४) ते शनिवार(ता. ८) दरम्यान अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा सॉफ्टबॉल संघ रवाना झाला आहे.

या संघात शिवछत्रपती पुरस्कार विजेती खेळाडू संघाची कर्णधार स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिश्मा कुडचे, प्रियंका अंची (सर्व शिवाजी विद्यापीठ), श्रावणी चौगुले, सानिका संकपाळ, अलिशा कांबळे, स्वाती कांबळे (सर्व महावीर कॉलेज), मनीषा पवार, आर्या पाटील (ए. सी. एस. कॉलेज, पलुस), निकिता पाटील, दीक्षा शिंदे (डॉ. पी. कदम महाविद्यालय रामानंदनगर), हर्षदा कांबळे (कन्या महाविद्यालय मिरज), सलोनी नलवडे (एस. जी. एम. कॉलेज, कराड), करिश्मा तारळेकर (विलिंग्डन कॉलेज, सांगली) यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. बाबासाहेब सरगर, मार्गदर्शक म्हणून प्रा. सुशांत कायपुरे काम पाहत आहेत. दरम्यान, गेली दोन वर्षे या संघाने कांस्य आणि रौप्यपदक प्राप्त करून राष्ट्रीय विद्यापीठ पातळीवर दबदबा निर्माण केला आहे. यंदा संघ सुवर्णपदकाची कमाई करेल, अशी शुभेच्छा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी खेळाडूंना दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. बाबासो उलपे, डॉ. राजेंद्र रायकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024
तरुण भारत

# विद्यापीठात उद्या चर्चासत्र

**कोल्हापूर :** उन्हाळयात देशभरात तापमानाच्या काट्याने उच्चांक केला. कोल्हापूर देखील त्याला अपवाद नाही. कोल्हापूर आणि एकूणच वाढलेले तापमान हा एक गंभीर प्रश्न बनलेला आहे. जागतिक तापमान वाढ,अल निनो परिणाम तसेच स्थानिक कारणे देखील कारणीभूत आहेत. या पार्श्वभूमीवर ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त सकाळी १०.३० वाजता 'कोल्हापूर ४१ अंश' या चर्चासत्राचे आयोजन शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र अधिविभागात केलेले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2024
तरुण भारत

# महिला सॉफ्टबॉल संघ आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी रवाना

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पगवारा, जालंधर (पंजाब) येथे ४ ते ८ जून दरम्यान ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल महिला स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला सॉफ्टबॉल संघ सहभागी होत आहे. शिवाजी विद्यापीठच्या महिला संघात शिवछत्रपती पुरस्कार विजेती खेळाडू संघाची कर्णधार स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पूरी, करिश्मा कुडचे, प्रियंका अंची (सर्व शिवाजी विद्यापीठ), श्रावणी चौगुले, सानिका संकपाल, अलिशा कांबळे, स्वाती कांबळे (सर्व महावीर कॉलेज, कोल्हापूर), मनिषा पवार, आर्या पाटील (ए. सी. एस. कॉलेज, पलुस) निकिता पाटील, दिक्षा शिंदे (डॉ. पी. कदम महा. रामानंदनगर), हर्षदा कांबळे (कन्या महा. मिरज) सलोनी नलवडे (एस. जी. एम. कॉलेज, कराड), करिश्मा तारळेकर(विलिंग्डनकॉलेज, सांगली) निवड झाली आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. बाबासाहेब सरगर व मार्गदर्शक म्हणून प्रा. सुशांत कायपुरे हे काम पाहत आहेत.